सं.फौ.ख.क्र.३९६/२०२१
सरकार वि.सुभाष
नि.क्र.१३ च्या खाली

साक्षीदार क्र ०१ ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–दिलीप बळवंतराव चव्हाण,
वय ५७ वर्ष, व्यवसाय– नोकरी,
राह.मंगळवारीपेठ उमरेड, ता.उमरेड, जि.नागपूर.

<u>**सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत**</u>

१. घटना दि.०२/०४/२०२१ रोजीची आहे. सदर दिवशी कोरोना काळ असल्यामुळे शासनाच्या नियमाप्रमाणे रात्री ८ नंतर आस्थापना सुरू ठेवायची नव्हती. त्यावेळी आम्ही नायब तहसिलदार, तहसिलदार, पोलिस पथक आणि नगरपरिषद उमरेडचे पथक असे तेथे रात्री ९.०० वाजता हरिओम शुध्द शाकाहारी भोजनालय येथे गेलो असता ते सुरू होते व त्या ठिकाणी लोकांचे जेवण सुरू होते. त्यामुळे शासनाच्या नियमाचे उल्लंघन केल्याचे दिसुन आले. त्यानंतर आम्ही पो.स्टे. उमरेड येथे तक्रार दिली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे त्यास **निशाणी क्र.१५** देण्यात आला. आता मला प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला त्यातील मजकूर खरा व बरोबर असुन त्यावर माझी सही आहे त्यास **निशाणी क्र.१६** देण्यात आला. पोलिसांनी माझे बयाण घेतले होते. मी आरोपीला पाहिल्यास ओळखु शकत नाही.

<u>**सरतपास संपला.**</u>

<u>**आरोपीतर्फे ॲड.श्री.जी.आर.हूंगे यांच्यामार्फत उलटतपास सुरू.**</u>

२. मी नगरपरिषद मध्ये ३३ वर्षापासुन स्वच्छता निरिक्षक म्हणुन कार्यरत होतो. हे म्हणणे खरे आहे की, कारवाई करण्यापुर्वी वरिष्ठांची लेखी परवानगी घ्यावी लागते. माझा ऑफिसचा वेळ सकाळी ६.०० ते सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत होती.

**प्रश्न–**तुम्हाला कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त कोणतीही कारवाई करता येत नव्हती बरोबर आहे काय?

**उत्तर–** कोरोना काळ असल्यामुळे आम्हाला वेळेचे बंधन नव्हते.

सदर कारवाईसंबंधी आम्हाला शासनाचे लेखी निर्देश नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, कार्यालयीन वेळेव्यतिरिक्त कार्यवाहीसाठी गेल्यास वरिष्ठांची परवानगी घेणे गरजेचे असते. हे म्हणणे खरे आहे की, सदर परवानगी अभिलेखावर दाखल केली नाही. साक्षीदार स्वत:हून

सांगतो की, कोराना काळ असल्यामुळे परवानगीची गरज नव्हती. हरिओम भोजनालय हे कोणाच्या मालकीचे आहे याबाबत मी दस्तऐवज अभिलेखावर दाखल केलेले नाही.

३. मी पोलिसांना बयाण व फिर्याद देतेवेळेस आम्ही घटनास्थळावर गेलो असता लोकं जेवण करित होते ही बाब सांगितली होती. आता मला माझे बयाण व फिर्याद दाखविण्यात आली त्यामध्ये सदर बाब नमुद नाही ती का नमुद नाही याचे कारण मला सांगता येत नाही. सदर भोजणालयामध्ये कोण–कोण जेवन करित होते याबाबत मी चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही घटनास्थळावर गेलो असता त्यावेळी सदर भोजनालय सुरू नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.०९.०४.२०२६

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड